ISSN 2278-8808 SJIF 2015: 5.403
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# प्रतिकूल परिस्थीतीशी झुंज देणारा मल्ल: आनंद यादव यांच्या साहित्य लेखनामधील प्रेरणा –

**प्रा. राजेंद्र आचार्य, Ph. D.**

*मराठी विभागप्रमुख, द.ग.तटकरे महाविदयालय, माणगांव – रायगड ४०२१०४*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रस्तावना :**

श्रेष्ठ कलाकृती वाचकांना, अभ्यासकांना सतत आव्हान देत असतात. या कलाकृती श्रेष्ठ का झाल्या? यांचा शोध घेण्यासाठी विविध अभ्यारूपध्दतीचा वापर करावा लागतो. तरीही त्यांचा शोध संपत नाही. कितीही शोध घेतला तरी त्यावर अंतिम भाष्य झाले असे होत नाही. त्यात काहीतरी अव्यक्त असे राहतेच, अशा अनन्यसाधारण कलाकृतीपैकी आनंद यादव यांची 'झोंबी' ही एक अनन्यसाधारण अशी प्रसिध्द कलाकृती आहे. आनंद रतन यादव हे एक बहुमुखी यशस्वी लेखक आहेत. कविता, कथा, कादंबरी, कांदबरिका, वगनाटय, समीक्षा, ललित अशा विविध साहित्यप्रकारात त्यांनी लेखन केले. आनंद यादव यांनी कोल्हापूर व पुणे येथून आपले शिक्षण पूर्ण केले. आकाशवाणीवर त्यांनी काही काळ नोकरी केली त्यानंतर पुणे विद्यापीठात प्रपाठक म्हणून नियुक्ती झाल्यावर तेथेच मराठी विभागप्रमुख म्हणून ते निवृत्त झाले त्यांच्या झोंबी या आत्मचरित्रासाठी १९९० मध्ये साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला आनंद यादव यांनी सुमारे ४० हुन अधिक पुस्तके लिहली आहेत. 'झोंबी' ही मराठी लेखक आनंद यादव यांनी लिहलेली आत्मचरित्रात्मक कांदबरी आहे. पु.ल. देशपांडे यांनी या पुस्तकाला प्रस्तावना लिहलेली असून या प्रस्तावनेला नाव इतकं सुरेख दिलंय....! 'झोंबी–एक बाल्य हरवलेलं बालंकांड' या नावामुळे या कादंबरीत काही तरी जगावेगळं असेल याची कल्पना येते. कारण बाल्याला बालकांड संबोधलंय म्हणजे बराच भोग, हाल – अपेष्टा, गरीबी असणार! असे वाटते. या प्रस्तावनेत पु.ल. देशपांडे म्हणतात की, हे आनंद यादवाचं आत्मकथन आहे. जर असं असेल तर आनंद यादव हयांना साष्टांग दंडवतच घालायला हवा. कारण या कथनात इतक्या भयंकर परिस्थितीतलं बालपण दाखवलंय ना..... की आपण कल्पनाही करू शकत नाही. अतिशय हट्टी आणि कामचुकार वडील, आपल्या अकरा मुलांचा जीवाच्या आकांताने सांभाळ करून संसार सावरणारी आई आणि भीषण दारिद्रय हयाचं इतकं विदारक शब्दचित्र लेखकाने चितारलंय की सगळं स्वत: भोगलं असल्यामुळे त्यातला निखार अंगावर येतो''[१]

शिक्षणाची, शाळेची, कलेची मनापासून आनंदला (आंद्या) आवड असते. खरं तर त्याच्या जातीत अशी काही आवड ठेवणं हाच जणू काही गुन्हा... अशी परिस्थिती होती. अतिशय हलाखीच्या दिवसातही त्याच्या मनातली शिक्षणाची ओढ काही कमी होत नाही. त्या धडपडीला तोड नाही. वेळप्रसंगी चोरी सुध्दा! बरोबरीच्या मुलाची शिकवणी, नकलांचे कार्यक्रम, रोजंदारी.... हे सगळं करून तो शिकतो. त्याच्या शिक्षणाला वडीलाचा जबरदस्त विरोध असतो कारण मुलगा शाळेत गेला तर शेतातली सगळी कामं त्यांच्यावर पडणार ! शिवाय

शाळेसाठी पैसे नाहीत. त्यामुळे त्यांना समजावणं हे सगळयात कठीण काम आनंदपुढे असते. शिक्षणासाठी तो वडीलाचा बेदम मार खातो. शेवटपर्यत म्हणजे अगदी घर सोडून जाईपर्यत त्याच्या वडीलाना त्याची शिक्षणाची तळमळ कळत नाही.

घरात अठराविश्वे दारिद्रय होते अशा प्रतिकूल वातावरणात तो शिक्षणाचा मूलमंत्र जिवापाड तो जपतो. घरात अकरा भावडं... अगदी एक पाठोपाठ झालेली त्यामुळे रोगट, अशक्त. घरात दोन्ही वेळेच्या जेवणाची भ्रांत! शेतकाम करून शाळेत गेल्यामुळे कायम मळलेले कपडे, आंघोळीला – कपडे धुवायला साबणसुध्दा नाही. वहया पुस्तक घ्यायला, फी भरायला पैसे नाहीत. शेतातल्या कामामुळे शाळेत जायला उशीर या सगळया कारणांमुळे शाळेत त्याला खूप शरमिदं वाटते. भरीस भर म्हणजे वडीलांचा शिक्षणाला विरोध ! तरीही अगदी हट्टाने त्यांनी एकेक वर्ष शिक्षण घेतलं. काही वेळेला शिक्षकांनी त्याची परिस्थिती समजून त्याला मदत केली तर काही वेळेला त्याला मुद्दाम त्रास दिला परंतु जात्याच हुशार असल्यामुळे शाळा बुडाली तरी पाठांतराचे त्यानेच वेगवेगळे प्रकार शोधून काढले. कामाच्या रामरगाडयातही त्याने कविता, शब्दार्थ, प्रश्नोत्तरे चालूच ठेवले. इतकं सगळं सांभाळूनही त्याने शाळेमध्ये कायम पहिला – दुसरा नंबर ठेवला. त्याच्या शिक्षणाच्या वेडाला जरी त्याच्या वडीलांनी कधी दाद दिली नसली तरी शेवटी त्यांनाही हार मानावीच लागली. मोठया कष्टाने त्याला एस.एस.सी.ची परीक्षा देण्याची परवानगी त्यांनी दिली वडीलांनी फारशी अडवणूक केली नाही आणि आनंदने त्याचं सोनं केले.

**२. आनंद यादव यांची ग्रंथसंपदा :**

**कविता** – हिरवे जग १९६०

मळयाची माती १९७८

मायलेकरं (दीर्घ कविता) १९८१

**कथासंग्रह** खळाळ १९६७

घरजावई १९७४

माळावरची मैना १९७६

आदिताल १९८०

डवरणी १९८२

उखडलेली झाडं १९८६

**व्यक्तिचित्रे**– मातीखालची माती १९६५

**ललित / वैचारिक लेखसंग्रह/ समीक्षा ग्रंथ** – स्पर्श कमळे १९७८

पानभवरे १९८२

१९६० नंतरची सामाजिक स्थिती आणि साहित्यातील नवे प्रवाह आत्मचरित्र मिमांसा

मराठी लघुनिबंधाचा इतिहास

**ग्रामीणता** : साहित्य आणि वास्तव

ग्रामीण साहित्य : स्वरूप व समस्या

मराठी साहित्य : समाज व संस्कृती

**कादंबरी** : गोतावळा १९७१

नटरंग १९८० या कांदबरीवर त्याच नावाचा मराठी चित्रपट निघाला आहे.

एककलकोंडा १९८०

माऊली १९८५

लोकसखा ज्ञानेश्वर २००५

संतसुर्य तुकाराम

**आत्मचरित्रात्मक** : झोंबी १९८० या कादंबरीवर लवकरच मराठी चित्रपट बनेल अशी बातमी आहे.

नांगरणी १९९०

घरभिंती १९९२

काचवेल १९९७

**संपादने** – १. मातीतले मोती १९७०

२. तिसऱ्या पिढीतील ग्रामीण कथा १९८१

**बालकथा –**

उगवती मने

### ३. झोंबी हे आत्मचरित्रात्मक पुस्तक लिहण्यामागच्या प्रेरणा–

झोंबी या आत्मचरित्रात्मक पुस्तकाच्या संदर्भात लेखक आनंद यादव म्हणतात –

झोंबी हे पुस्तक लिहण्यामागे माझ्या मनात काही प्रेरणा कारणीभूत आहेत. पहिली प्रेरणा सामाजिकतेशी संबधित आहे. मी मराठी भाषेचा एक सर्वसामान्य प्राध्यापक शिवाय मराठी भाषेचा एक नम्र साहित्यिकही आहे. १९७०–७१पासून व्याख्यानाच्या निमित्ताने मी सबंध मराठी प्रदेशातून हिडत फिरत होतो. त्याकाळात दहा एक वर्ष मी महाराष्ट्रातील तरूण पिढीची मानसिकता समजून घेण्याचा प्रयत्न करीत होतो. या काळात प्रथम एक बाब तीव्रतेने माझ्या लक्षात आली की, ग्रामीण भागातील तरूण पिढीच्या मनाला शिक्षणाचे महत्व मनापासून जाणवत नाही. शैक्षणिक पदवी ही केवळ नोकरी मिळविण्यासाठी प्राप्त करून घ्यावयाची उपाधी आहे. त्यामुळे सामान्यपणे विद्यापीठातील, महाविदयालयातील आपला शैक्षणिक काळ हा केवळ मौजमजा करण्याचा आहे असे त्यांना वाटे. शिक्षणाकडेही ते याच दृष्टीनं पाहत. शिक्षक हा शिकविण्याचे काम करणारा एक नोकर माणूस आहे. या पलिकडे त्याला काही स्थान नाही असेच या विद्यार्थ्यांना वाटे याची मला तीव्रतेने जाणीव झाली... १९७०–७२ नंतरच्या काळात हळूहळू शिक्षित तरूण पिढीला नोकऱ्या मिळणे कठीण होऊ लागले. शिक्षित बेकाराची संख्या हळूहळू वाढू लागली. नोकरी मिळू शकत नसल्याने या पिढीला निराशेने मोठया प्रमाणात ग्रासलेले आणि घेरलेले जाणवू लागले याचा परिणाम

त्या पिढीच्या मातापित्यांवर, वडीलधाऱ्या माणसांवर मोठया प्रमाणात होऊ लागला. कारण ग्रामीण विभागातील या तरूण पिढीचे आई वडील पूर्णपणे निरक्षर, अडाणी, कष्टकरी वर्गातील होते. तरूण पिढीविषयांच्या त्यांच्या आशा – आकांक्षा, स्वप्ने – अपेक्षा पार धुळीला मिळून गेल्या. कारण त्यांनी आपल्या तरूण पिढीसाठी आपले सर्वस्व वेचले होते. शेतजमीनीवर कर्ज काढून किंवा प्रसंगी त्या विकून मुलांच्या शिक्षणासाठी पैसा उभा केला होता आणि खर्ची घातला होता. कारण त्या काळात खेडेगावापासून दूर दूर तालुक्याच्या ठिकाणी किंवा जिल्हयाच्या ठिकाणी शिक्षणाची सोय असल्याने त्यांना दुसरा पर्याय उपलब्ध नव्हता. एवढे करूनही शिक्षण घेतल्यावर नोकरीही नाही आणि चरितार्थाचे दुसरे साधनही नाही अशी त्यांची केविलवाणी अवस्था झाली होती. त्याची ही अवस्था पाहून नवशिक्षित तरूण पिढीही निराशाग्रस्त झालेली होती. तिलाही त्यातून बाहेर कसे पडायचे हे कळेनासे झाले होते. नव्या पिढीला आणि तिच्या माता–पित्यांचा शिक्षणाकडे पाहण्याचा हा 'नोकरीवादी' दृष्टिकोन मला अपुरा, चुकीचा आणि उथळ वाटत होता. त्यामुळे मी मनोमन अस्वस्थ आणि निराश होत होतो. या नव्या पिढीने आणि त्यांच्या मातापित्यांनीही शिक्षणाकडे अधिक गांभिर्याने आणि सखोलतेने पाहण्याची नितांत गरज आहे असे वाटत होते. चांगल्या शिक्षणाने माणसाचा सर्वांगिण विकास होतो. त्याची विचारशक्ती, चिंतनशक्ती, भावशक्ती, कृतिशक्ती, इत्यादी बाबी शिक्षणामुळे अधिक परिपक्व होतात. अशी माझी शिक्षणविषयक धारणा होती. शिक्षणामुळे हा जो व्यक्तीचा मानसिक विकास होतो, त्यामुळे नवसमाजरचना करण्यास, नवी निर्मिती करण्यास फार मोलाची मदत होते. अशी माझी शिक्षणविषयक भूमिका होती. शिक्षणामुळे प्राप्त झालेले व्यक्तीचे नवव्यक्तिमत्व तिच्या जीवनाला, कुटूंबाला, स्वत:ला अंतर्बाहय बदलू शकते. असे मला वाटत होते... या सर्वामागे माझा अनुभव मला साथ देत होता. तोपर्यंतचे माझे गतआयुष्य मला हेच सांगत होते. परिणामी कळत न कळत मी माझ्या गतायुष्याचे तपशीलवार अवलोकन करू लागलो. ज्या कष्टकरी ग्रामीण समाजातील कुटूंबात जन्मलो आणि त्यातूनच ढोरकष्ट करत शिकण्यासाठी धडपडत एम.ए. पर्यंत शिक्षण घेतलं तशा शेतीहीन, शेतमजूराच्या समाजातीलच मुले मला भेटत होती. मी माझे शिक्षणपूर्ण करून स्वप्रयत्नानेच नोकरी मिळवली. नोकरीमिळवल्या वर माझ्या घरादाराची घडी मी व्यवस्थित बसवली. अनेकानेक कारणांनी मला लहानपणीच शिक्षणाचे महत्व पदोपदी पटत गेले होते. हे महत्व ग्रामीण भागातील शेतमजूर समाजातील तरूण पिढीलाही कळत गेले पाहिजे आणि पटतही गेलं पाहिजे याशिवाय आणखी एक कारण आहे... विशेषत: महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यापासून ग्रामीण महाराष्ट्रातील जीवनाला गतिमानता प्राप्त झाली आहे. बदल घडत आहेत. स्थित्यंतरे होत आहेत. या स्थित्यंतराची नोंद साहित्यात झाली पाहिजे. विशेषत: ग्रामीण साहित्य जाणीवपूर्वक गांभीर्याने लिहले पाहिजे. केवळ 'मनोरंजनाचे साहित्य' म्हणून ग्रामीण साहित्याकडे पाहता कामा नये. उलट ते सत्तर टक्के भारतीय मराठी समाजाचे साहित्य म्हणून; त्याकडे पाहिले पाहिजे.'' या दोन प्रेरणा प्रा. डॉ. आनंद यादव यांच्या साहित्य लेखनामागच्या होत्या.

**४. झोंबीचा आशय :**

साहित्य अकादमी पुरस्कार मिळालेली 'झोंबी' ही कादंबरी नेहमीच आऊट ऑफ स्टॉक असते. इतकी ती लोकप्रिय आहे. 'झोंबी' या शब्दाचा अर्थच कुस्ती खेळणे' किंवा 'झगडणे' असा होतो. आनंद यादव या व्यक्तीचे बालपण अतिशय प्रखर परिस्थितीतून गेले आहे. हा बालपणी सोसावा लागलेला संघर्ष वाचताना डोळयातून अश्रुधारा वाहू लागतात. घरची बेताची परिस्थिती त्यातच जोडीला ९ भावंडे. शाळेला जाण्याचा विचार करणेही जेथे गुन्हा ठरले होते. त्या घरातून एक ध्येयवेडा मुलगा शिक्षण पूर्ण करून डॉ. आनंद यादव होतो त्याचे

शिक्षण इयत्ता चौथी पूर्ण होताच बंद केले गेले. नंतर त्याला शेतकीच्या कामामध्ये वडीलांच्या हाताखाली झिजावे लागले. 'झिजावे' हा शब्द अशासाठी वापरला की, त्याचे वडील रतन जकाते काम करण्यात चालढकल करीत, शक्यतो सगळी कामे बायको मुलांना करायला लावून स्वत: गावभर हिंडत असत. आईलाही दहा पोरांना सांभाळून, घरच—दारचं आणि शेतातलं काम बघावं लागे. घरात अगदी ३—४ वर्षाच्या मुलांनाही कष्टाची कामे करावी लागत होती. पुरेशा वेळेअभावी आंघोळसुध्दा रोज करणे शक्य नव्हते. अस्वच्छता आणि उपासमार ही रोजचीच जणू. अशा या वातावरणात चौथी पास झालेला हा मुलगा शिक्षणाच्या ओढीने आत आत झुरत होता. इयत्ता चौथीपर्यंत त्यांच्या आयुष्यात असे काही शिक्षक आले ज्याच्यामुळे त्याला भाषा, इतिहास या विषयाची गोडी लागली. शिक्षणाची ओढ जागी झाली. मग कसे बसे हाता — पाया पडून, वडीलाचा मार खाऊन पाचवीला प्रवेश घ्यायला परवानगी मिळाली. त्यातही शेतातली कामे करायची आणि मगच शाळेला जायचे व पाच वाजता शाळा सुटली की, लगेचच शेतात कामावर रूजू व्हायचे या अटीवर त्याला शाळेत जाण्याची परवानगी मिळाली. अशा तंग परिस्थितीत जमेल तेव्हा, जमेल तितकावेळ शाळेत जाऊन ज्ञानाचा थेंब न थेंब आंनदाने अगदी चातकासारखा टिपला. शेतातली कामे करता करता अभ्यासाची उजळणी करीत होता. घरून वहया—पुस्तकासाठी पैसे मिळणे शक्य नव्हते. तेव्हा इतर काही कामे करून, शेण्या विकून, गायी म्हशीसाठी चारा विकून एक एक पै साठवून तो वहया पुस्तकांची गरज भागवीत असे. प्रसंगी घरी खोटे बोलून, घरामध्ये चोरी करूनही त्याने पैसे जमविले. अगदी पुस्तके घेणे शक्य झाले नाही तर तो वर्गमित्रांकडून पुस्तके आणून अभ्यास करत असे. प्राथमिक शाळेतील शिक्षकांना त्याच्या परिस्थितीविषयी आणि त्याच्या वडिलांच्या शिक्षणविरोधी स्वभावाची कल्पना होती. त्यामुळे त्याला काही गोष्टीची सवलत मिळाली हेच एक वाईटामध्ये चांगले होते. कसा बसा अभ्यासासाठी वेळ काढून त्याने सातवीची परीक्षा दिली आणि प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला. त्यानंतरचे शालेय शिक्षण घेताना त्याला आणखीनच अडचणी आल्या कारण पुढे काही कारणाने त्याला फी मध्येही सवलत मिळेनाशी झाली. फीचे १५ रूपये भरणेही त्याच्यासाठी शक्य नव्हते. अशावेळी त्याने आबाजी या आपल्या मित्राची शिकवणी घ्यायला सुरूवात केली आणि पैसे जमविले. रोज कामाचा घाणा ओढून, शरीर, मन कितीही थकले तरी अभ्यासाचा कंटाळा केला नाही. वडीलाच्या शिव्या, मार खाऊनही शिक्षणासाठी आनंद कधीही बधला नाही. अशातच कविता लिहण्याचा छंद जडलेला. इथेच कधीतरी त्याच्या साहित्यिक मनाची रूजवण झाली. मॅट्रीकला असताना शिक्षणासाठी घर सोडावे लागले. या प्रसंगानंतर दहावीच्या शिक्षणासाठी वडिलांनी फारशी अडवणूक केली नाही. अशा या बिकट परिस्थितीतून वाट काढत आनंद दहावी पास झाला. हे सगळे होत असताना त्याच्या दोन भावंडाचे मरणही त्याने पाहिले. कुपोषणाचे बळी असलेले काही भावंडे नाळरोगी होते तर काहींना अन्नअभावी माती खाण्याची सवय लागलेली. थोडक्यात 'झोंबी' या शब्दाचा अर्थच, कुस्ती खेळणे किंवा झगडणे असा होतो. आईला एका मागोमाग एक मुले होत असल्याने तिची खालावणारी तब्येत, गरीबीमुळे होणारी उपासमार, भांवडाचे होणारे हाल, वडीलांचा शिक्षणाला असलेला विरोध, आंनदला शाळेत जाण्याआधी आणि शाळेतून आल्यानंतर शेतात जास्तीत जास्त राबवून घेण्याकडे असलेला कल, कधी कधी तर शाळेला जाण्याच्या वेळेला मुद्‌दामच काही कामे काढून त्याची केलेली अडवणूक, या सगळया खडतर परिस्थितीवर मात करून शिक्षणाच्या मार्गातून पाय हटू न देता आनंद कसा झगडत राहतो याचे वर्णन म्हणजे झोंबी.

**५. समारोप**

दारिद्रय–अज्ञानाच्या प्रतिकूलतेशी झोंबी देत शिक्षण घेऊन शून्यातून विश्व निर्माण करू पाहणाऱ्या खेडयातल्या असंख्य तरूणांना ही आत्मचरित्रपर कांदबरी प्रेरणा देणारी कांदबरी आहे आणि

हे जीवन म्हणजे संघर्षाचे लेणे।

रे जगण्यासाठी सदैव झोंबी देणे।। या झोंबी गीताप्रमाणे रूढी–परंपराच्या किर्र दाटलेल्या रानातून गरूडासमान झेप घेऊन वाट काढणाऱ्या, अज्ञानाच्या भोवती पसरलेल्या अंधारातून स्वत: जळून प्रकाश होणाऱ्या, दारिद्रयामागच्या गंडस्थळावर वनराज होऊन झेप घेणाऱ्या वनराजाप्रमाणे आणि पशूतून मानवनिर्माण करण्यासाठी झुंज देत देत त्यातून स्वत:ची मूर्ती घडवणाऱ्या प्रतिकूल परिस्थितीशी चिवटपणे झुंज देणाऱ्या यशस्वी मल्लाची ही कहाणी आहे.

**संदर्भ ग्रंथ :–**

*यादव आनंद–झोंबी, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, पहिली आवृत्ती १९८७*

*झोंबी विविध परिमाणे – संपा. कैलास सार्वेकर, पृ. १७–१९ प्रतिभास प्रकाशन परभणी मार्च २०१२*